# दुचाकी चोरटा पोलीस स्टेशन हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळ्यात

फिर्यादी नामे संतोष किसनाजी येणोरकर, रा. गोमाजी वार्ड, हिंगणघाट हे दि.०३-११-२०२१ रोजी दुपार दरम्यान फिर्यादी हे त्यांचे लाडकी शिवारातील शेतात कामानिमीत्य गेले तेव्हा त्यांच्या मालकीची ज्युपीटर मोपेड गाडी ही शेताचे धुऱ्यावर लावुन शेतात गेले व शेताचे काम करून काही वेळाने गाडी जवळ परत आले असता त्यांना त्यांची गाडी नमुद ठिकाणी दिसुन आली नाही सदर मोपेडचा आजुबाजुचे परिसरात शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे अप.क्र. १०२६/२०२१ कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याची तात्काळ दखल घेवून गुन्हे प्रकटीकरण पथकाने मिळालेल्या विश्वसनीय माहितीच्या आधारे विधीसंघर्षीत बालकाचे ताब्यातुन गुन्ह्यातील ज्युपीटर मोपेड गाडी क्र. एमएच-३२/एएन-१६९७ अंदाजे कि. ३०,०००/- रू. चा माल जप्त करून गुन्हा उघडकीस आणला.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट श्री दिनेश कदम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री संपत चव्हाण यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार विवेक बनसोड, शेखर डोंगरे, पंकज घोडे, प्रशांत वाटखेडे, उमेश बेले सर्व नेमणूक पोलीस स्टेशन हिंगणघाट यांनी केली.